# दक्षिण मुंबईतील ब्रिटिशकालीन उड्डाणपूल हळूहळू इतिहासजमा

## भविष्यात या पुलांची पुनर्बांधणी; एस पूल झाला १११ वर्षांचा!

सीमा महांगडे
लोकमत न्यूज नेटवर्क

ब्रिटिशांनी मुंबईत उभारलेले उड्डाणपूल इतिहासजमा होऊ लागले आहेत. धोकादायक बनलेल्या पुलांची पुनर्बांधणी सुरू आहे. भविष्यात महाराष्ट्र रेल इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेन्ट कॉर्पोरेशन (महारेल) रेल्वे आणि महापालिकेच्या मदतीने ब्रिटिशकालीन उड्डाणपूल पाडून त्याजागी नवे पूल बांधण्याचे नियोजन आहे.

### पुनर्बांधणी झालेले

**हँकॉक पूल :** सॅन्डहर्स्ट रोड स्थानकाजवळ १८७९ मध्ये बांधण्यात आला होता. धोकादायक बनल्याने २०१६ मध्ये पाडण्यात आला. त्या जागी नव्या पुलाची उभारणी करण्यात आली. त्यासाठी बराच कालावधी लागला.

**डिलाइल रोड :** लोअर परेल येथील डिलाइल उड्डाणपूलही २४ जुलै २०१८ पासून वाहतुकीसाठी बंद करण्यात आला. या पुलाची उभारणीही ब्रिटिशकाळात झाली होती. पश्चिम रेल्वे आणि महानगरपालिकेने या उड्डाणपुलाची बांधणी केली. तो २०२३ मध्ये खुला करण्यात आला.

**फरेरे पूल :** चर्नी रोड आणि ग्रॅन्ट रोड स्थानकांदरम्यान १९२१ मध्ये उभारण्यात आलेला फरेरे उड्डाणपूल २०२० मध्ये पाडण्यात आला आणि पुनर्बांधणीनंतर तो नोव्हेंबर २०२१ पासून वाहतुकीसाठी खुला करण्यात आला. त्यानंतर सीएसएमटी ते मशीद बंदर स्थानकांदरम्यान १८६८ साली कर्नाक उड्डाणपूल बांधण्यात आला.

### या पुलांची कामे सुरू

**रे रोड :** हा उड्डाणपूल १९१० साली उभारण्यात आला. पूल पाडून त्या जागी केबल स्टेड उड्डाणपूल उभारण्यात येणार आहे. नवीन पुलाची लांबी २८० मीटर असेल आणि १७५ कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. रे रोड रेल्वे स्थानकाजवळ हा उड्डाणपूल उभारल्याने माहुल रोड आणि बॅरिस्टर नाथ पै मार्गाचे रॅम्प नवीन प्रस्तावित पुलाला जोडण्यात येतील. या पुलाचे ७७ टक्के काम पूर्ण झाले आहे. तो वाहतुकीसाठी नोव्हेंबर २०२४ पर्यंत खुला करण्याचे उद्दिष्ट आहे.




**दादर टिळक :** पश्चिम आणि मध्य रेल्वे मार्गावर दादर स्थानकाशेजारचा हा उड्डाणपूल १९२३ मध्ये बांधण्यात आला होता. आता येथे बांधण्यात येणाऱ्या केबल स्टेड पुलाची लांबी ६०० मीटर असेल आणि नव्या पुलासाठी ३७५ कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. टिळक पूल हा दादर पश्चिम आणि पूर्व भागाला जोडणारा पूल आहे. याचे आतापर्यंत जवळपास ८ टक्के काम पूर्ण झाले आहे.

**भायखळा :** भायखळा आणि सॅन्डहर्स्ट रोड स्थानकांच्या मध्ये असलेला हा उड्डाणपूल १९२२ मध्ये उभारण्यात आला. आता उभारण्यात येणाऱ्या नव्या पुलाची लांबी ६५० मीटर असेल आणि उभारणीचा अंदाजे खर्च २०० कोटी रुपये आहे. या पुलाचे आतापर्यंत ४२ टक्के काम पूर्ण झाले आहे. हा पूल वाहतुकीसाठी ऑक्टोबर २०२५ पर्यंत खुला करण्याचे उद्दिष्ट आहे.

**कर्नाक पूल :** दक्षिण मुंबईतील पूर्व-पश्चिम परिसराला जोडणारा हा पूल महत्त्वाचा असून १८६८ मध्ये बांधण्यात आला होता. कर्नाक पुलाच्या खालून उपनगरीय रेल्वे, मेल-एक्स्प्रेस आणि यार्डच्या मार्गिका आहेत. हा पूल सहा खांबांवर उभारण्यात आला होता. धोकादायक बनल्याने २२ ऑगस्ट रोजी वाहतुकीसाठी बंद करण्यात आला. त्यानंतर महापालिकेकडून येथे नवीन उड्डाणपुलाची उभारणी करण्यात येत असून येत्या वर्षभरात तो वाहतुकीसाठी खुली होण्याची चिन्हे आहेत.

(सर्व छायाचित्रे : दत्ता खेडेकर)




भायखळ्यातील एस पूल हा पी. एस. मंडलिक किंवा गार्डन ब्रिज या नावानेही ओळखला जातो. जिजामाता उद्यानाजवळील पूर्व आणि पश्चिम भागांना जोडणारा हा पूल १९१३ साली बांधण्यात आला होता. हा मुंबईतील सगळ्यात जुन्या पुलांपैकी एक आहे. मात्र, अजूनही चांगल्या स्थितीत असल्याने त्याच्या पुनर्बांधणीचे काम हाती घेण्यात आलेले नाही.




१३० वर्षे जुना असलेला हा मुंबईतील पूल २४ जूनपासून वाहतुकीसाठी पुढील १८ महिन्यांसाठी बंद ठेवण्यात आला आहे. मुंबई सेंट्रल येथील बेलासिस आरओबी (रोड ओव्हर ब्रिज) पूर्वेकडील डॉ. आनंदराव नायर मार्ग ते पश्चिमेला वसंतराव नाईक चौक यांना जोडणारा हा पूल आहे. दक्षिण मुंबईतील ब्रिटिशकालीन पुलांमध्ये बेलासिस पुलाचा समावेश होतो. पुलाची उभारणी १८९३ मध्ये करण्यात आली होती. १३० वर्षे जुन्या असलेल्या या पुलाची लांबी ३८० मीटर आणि रुंदी २२.२० मीटर आहे.




१९१५ मध्ये परळ आणि लोअर परळ स्थानकांना जोडण्यासाठी हा दगडी बांधकामाचा पूल बांधण्यात आला. लालबाग-हिंदमाता भागातून लोअर परळच्या दिशेने जाणारा हा महत्त्वाचा पूल आहे. या पुलाच्या पुनर्बांधणीसाठी प्राथमिक टप्प्यातील अभ्यास सुरू आहे. या पुलाच्या पुनर्बांधणीमुळे वाहतूककोंडी कमी होईलच; पण वेळ, इंधनाची बचतही होईल.




चिंचपोकळीतील हा पूल ब्रिटिशकालीन असून आजही चांगल्या स्थितीत असल्याचे रेल्वे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे सध्या तरी त्याच्या पुनर्बांधणीचे काम हाती घेतले जाणार नसल्याचे पालिकेकडून सांगण्यात आले. मध्य रेल्वे प्राधिकरणाकडून येत्या काही वर्षांत या पुलाचे फेरसर्वेक्षण केले जाणार आहे. त्यानंतर पुढील निर्णय घेतला जाईल.




ऑलिव्हन्ट पूल हा माझगाव पूल म्हणून ही ओळखला जातो. हाही दक्षिण मुंबईतील ब्रिटिशकालीन पूल आहे. हा पूल आजही चांगल्या स्थितीत आहे. त्यामुळे याच्या पुनर्बांधणीची तत्काळ आवश्यकता नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर आणखी काही वर्षांत रेल्वे प्राधिकरणाकडून या पुलाचे सर्वेक्षण हाती घेण्यात येईल आणि आराखडा तयार करण्यात येईल.